## आजचे पंचांग

बुधवार, दि. १० जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, दशमी रात्री १२-५८ पर्यंत नंतर एकादशी तिथी, दिवस नक्षत्र– उत्तराभाद्रपदा सकाळी ९-२२ पर्यंत नंतर रेवती, चंद्र रास - मीन, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## रिक्षा दरवाढीची मागणी

**पुणे** : गेल्या काही महिन्यांपासून मध्यपूर्वेतील युद्धामुळे होणारी सीएनजीची दरवाढ, वाढती महागाई, सुट्या भागांचे वाढलेले भाव आणि ओला-उबेर-रॅपिडोसारख्या कंपन्यांमुळे रिक्षा व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे रिक्षाचालकांना त्वरित मीटरभाडे दरवाढ मिळावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रिक्षा संघटनांनी दिला आहे. भाडेवाढीच्या मागणीचे निवेदन पुणे आरटी कार्यालयात उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांना दिले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. १० जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २५५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### फटाके गोडाऊनला भीषण आग

**जयपूर** : खोह नागोरियान भागातील एका बेकायदा फटाक्यांच्या गोदामात मंगळवारी सकाळी झालेल्या स्फोटात आठ जण जिवंत जळून खाक झाले. आयशा नगर तलाई कॉलनीतील एका छोट्या घरात ही आग लागली, जिथे फटाके ठेवले होते. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि काँग्रेस नेते अशोक गेहलोत यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

### तेजस्वी यादव यांची सरकावर टीका

**पाटणा** : राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी बिहार सरकारवर जोरदार टीका करत उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी हे सवंग राजकारण करत असल्याचा आरोप केला. तेजस्वी यादव यांनी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारवर भ्रष्ट अधिकारी आणि गुन्हेगारांना संरक्षण देत असल्याचा आरोप करत राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडल्याचा दावा केला. बिहारमध्ये गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असून प्रशासन त्यावर नियंत्रण मिळवण्यात अपयशी ठरत असल्याचे ते म्हणाले.

### भाजपने महिलेला अध्यक्ष केले नाही

**हैदराबाद** : भाजप आणि बीआरएसवर टीका करताना तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी मंगळवारी सांगितले की, दोन्ही पक्षांनी स्थापनेपासून महिला अध्यक्षांची नियुक्ती केलेली नाही. ते म्हणाले की, बांगलादेशला स्वतंत्र करणाऱ्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना 'आयर्न लेडी' म्हणून गौरविण्यात आले, तर काँग्रेसने महिलांना देशाच्या राष्ट्रपती आणि मुख्यमंत्री केले.

### मद्रास उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

# प्रत्येक दर्गा वक्फ मालमत्ता ठरत नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**चेन्नई** : प्रत्येक दर्गा किंवा कब्र ही आपोआप वक्फ मालमत्ता ठरत नाही. एखादी मालमत्ता मुस्लिम धार्मिक संस्था असल्याच्या आधारावर वक्फ बोर्डाला तिच्यावर अधिकार सांगता येणार नाही. संबंधित मालमत्ता कायदेशीररित्या वक्फ असल्याचे पुराव्यांसह सिद्ध करणे आवश्यक आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मद्रास उच्च न्यायालयाने तामिळनाडू वक्फ बोर्डाचा २४० वर्षे जुन्या दर्ग्याला वक्फ मालमत्ता घोषित करण्याचा आदेश रद्द केला.

ट्रिप्लिकेन येथील कामराज रोडवरील दर्ग्याच्या व्यवस्थापनाशी संबंधित वादावर सुनावणी करताना न्यायमूर्ती के. गोविंदराजन थिलाकवथी यांनी हा निर्णय दिला. दर्ग्याच्या मुतवल्लीच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेत, संबंधित दर्गा सुमारे २४० वर्षे जुना असून त्याची देखभाल पिढ्यान्पिढ्या कुटुंबाकडून केली जात असल्याचा दावा करण्यात आला होता. तसेच वक्फ बोर्डाने दुसऱ्या व्यक्तीची मुतवल्ली म्हणून केलेली नियुक्तीही आव्हान देण्यात आली होती.

याचिकाकर्त्यांनी न्यायालयात मांडलेल्या बाजूनुसार, संबंधित जमीन वक्फ बोर्डाची नसून सार्वजनिक बांधकाम विभागाची (पीडब्ल्यूडी) आहे. वक्फ कायद्यानुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण न करता बोर्डाने या मालमत्तेला वक्फ मालमत्ता घोषित केले असून त्याला कायदेशीर अधिकार नाही, असा दावा करण्यात आला.

दुसरीकडे, तामिळनाडू वक्फ बोर्डाने दर्गा आणि त्याचा परिसर मूळतः धार्मिक संस्थेच्या मालकीचा असल्याचे सांगत आपली बाजू मांडली. काही काळानंतर ही जमीन सरकारी यंत्रणांच्या ताब्यात गेली असली तरी वक्फ कायद्यांतर्गत तिच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू असल्याचे बोर्डाने स्पष्ट केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाने मात्र ही जमीन सरकारी 'पोरंबोक' जमीन असल्याचे सांगितले. तसेच ती भारत स्काऊट्स अँड गाईड्स संस्थेला विनामूल्य वापरासाठी देण्यात आल्याचे न्यायालयाला कळविले.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, संबंधित मालमत्तेचे वक्फ म्हणून सर्वेक्षण झाल्याचा, ती वक्फ यादीत समाविष्ट असल्याचा किंवा सरकारी राजपत्रात तिची वक्फ मालमत्ता म्हणून अधिसूचना प्रसिद्ध झाल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे केवळ दर्गा अस्तित्वात आहे म्हणून ती मालमत्ता वक्फ असल्याचे गृहीत धरता येणार नाही.

न्यायालयाने स्पष्ट केले की, खासगी कौटुंबिक मकबरा आणि सार्वजनिक धार्मिक स्वरूपाचा दर्गा यांच्यात स्पष्ट फरक आहे. एखाद्या मालमत्तेचे वक्फ म्हणून सर्वेक्षण, नोंदणी किंवा अधिसूचना नसल्यास वक्फ बोर्डाला तिच्यावर अधिकार सांगता येत नाही. वक्फ बोर्डाचे अधिकार हे केवळ संबंधित मालमत्ता कायदेशीरदृष्ट्या वक्फ असल्याचे सिद्ध झाल्यासच लागू होतात, असे न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले.

## उज्ज्वला लाभार्थ्यांना धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अनुदानित एलपीजी सिलिंडरांच्या संख्येत मोठी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे लाभार्थी कुटुंबांना वर्षाला ९ ऐवजी केवळ ४ अनुदानित सिलिंडर मिळणार आहेत.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव प्रवीण मल खनूजा यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. उज्ज्वला योजनेतील कुटुंबांचा सरासरी वार्षिक गॅस वापर लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मे २०१६ मध्ये सुरू झालेल्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत सुरुवातीला लाभार्थ्यांना वर्षाला १२ अनुदानित सिलिंडर दिले जात होते. त्यानंतर ही संख्या ९ वर आणण्यात आली होती. आता ती आणखी कमी करून ४ करण्यात आली आहे.

दरम्यान, देशात एलपीजीच्या किमती सातत्याने वाढत असताना हा निर्णय घेण्यात आल्याने विरोधकांनी टीका सुरू केली आहे. ७ जून रोजी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ करण्यात आली. त्यामुळे दिल्लीत १४.२ किलोच्या सिलिंडरची किंमत ९४२ रुपयांवर पोहोचली आहे. गेल्या तीन महिन्यांत सिलिंडरच्या दरात एकूण ८९ रुपयांची वाढ झाली आहे.

खनूजा यांनी सांगितले की, सरकारला एका एलपीजी सिलिंडरचा पुरवठा करण्यासाठी सुमारे १,६०० रुपये खर्च येतो. त्यामुळे अनुदानित दरात सिलिंडर उपलब्ध करून देताना सरकारकडून प्रति सिलिंडर जवळपास १,००० रुपयांची अप्रत्यक्ष मदत दिली जाते.

सरकारच्या या निर्णयामुळे उज्ज्वला योजनेतील कोट्यवधी लाभार्थी कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## चार वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्य शासनाने मंगळवारी चार वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. या फेरबदलात डॉ. माधवी खोडे-चावरे, अनिता मेश्राम, सुनील महिंद्राकर आणि आदित्य जिवाणे यांना नव्या पदांवर नियुक्त करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून प्रशासकीय यंत्रणेत सातत्याने फेरबदल करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून या बदल्या करण्यात आल्या आहेत.

शासनाच्या आदेशानुसार, नागपूर विभागाच्या अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे-चावरे यांची मंत्रालयातील अल्पसंख्याक विकास विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांची बदली मनरेगा आयुक्त, नागपूर या पदावर करण्यात आली आहे. सुनील महिंद्राकर यांची अतिरिक्त मुद्रांक नियंत्रक, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील महावितरणचे सह व्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवाणे यांची जळगाव महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर जळगाव महानगरपालिकेच्या प्रशासनाला नव्या नेतृत्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने सुरू आहे.

### १,४०० कोटींच्या मदतीस मंत्रिमंडळाची मंजुरी

# कर्जमाफीपासून वंचित ६ लाख शेतकऱ्यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्यातील २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफी योजनांसाठी पात्र ठरूनही विविध तांत्रिक व प्रशासकीय कारणांमुळे लाभापासून वंचित राहिलेल्या सहा लाखांहून अधिक शेतकऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अशा शेतकऱ्यांसाठी सुमारे १,४०० कोटी रुपयांच्या मदतीस मंजुरी देण्यात आली.

यापूर्वी राज्यात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना आणि महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आल्या होत्या. या योजनांमधून लाखो शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला. मात्र, आधार क्रमांक पडताळणीतील अडचणी, बँक खात्यांमधील विसंगती, जमीन अभिलेखांतील त्रुटी, अपूर्ण कागदपत्रे आणि अन्य तांत्रिक कारणांमुळे अनेक पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहिले होते.

सरकारी आकडेवारीनुसार अशा शेतकऱ्यांची संख्या सहा लाखांपेक्षा अधिक आहे. गेल्या काही वर्षांपासून शेतकरी संघटना, लोकप्रतिनिधी आणि विविध राजकीय पक्षांकडून या शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. अनेक जिल्ह्यांमध्ये आंदोलने आणि निवेदने देण्यात आली होती. अखेर राज्य सरकारने या प्रकरणाचा सर्वंकष आढावा घेत निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या हजारो शेतकरी कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. तसेच आगामी खरीप हंगामासाठी कर्जपुरवठा आणि शेतीतील गुंतवणुकीचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी या निर्णयाची प्रतीक्षा करत होते.

दरम्यान, मंत्रिमंडळाने प्रशासन अधिक कार्यक्षम आणि गतिमान करण्यासाठी मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेलाही मंजुरी दिली. सध्या अस्तित्वात असलेल्या ३३ विभागांची संख्या वाढवून ४३ करण्यात येणार आहे. काही उपविभागांना स्वतंत्र विभागाचा दर्जा देण्यात येणार असून त्यामुळे निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान होईल, असा सरकारचा दावा आहे. या पुनर्रचनेसाठी कोणतीही नवीन पदनिर्मिती केली जाणार नसून विद्यमान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमार्फतच कामकाजाचे पुनर्वाटप केले जाणार आहे. त्यामुळे शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. याशिवाय, उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधित काही महत्त्वाच्या प्रस्तावांनाही बैठकीत मंजुरी देण्यात आली. उद्योग क्षेत्राच्या गरजांशी सुसंगत कौशल्याधारित शिक्षण, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आणि उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

### विजय सरकारने स्थापन केला 'सिंगाप्पन स्पेशल टास्क फोर्स'

# महिलांच्या सुरक्षेसाठी आता विशेष पथक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई** : तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी महिलांच्या सुरक्षेला बळकटी देण्यासाठी 'सिंगाप्पन स्पेशल टास्क फोर्स'ची स्थापना केली आहे. महिलांवरील गुन्हे रोखणे, संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत पुरवणे आणि महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी विशेष यंत्रणा उभी करणे हा या पथकाचा मुख्य उद्देश आहे. या दलाचे वैशिष्ट्य म्हणजे ते पूर्णपणे महिला पोलिसांपासून बनलेले असून त्याला 'ऑल विमेन पोलीस युनिट' म्हणूनही ओळखले जात आहे.

या विशेष दलाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री विजय यांनी महिलांच्या सुरक्षेला सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. निवडणुकीपूर्वी दिलेले आश्वासन पूर्ण करत सरकारने पदभार स्वीकारल्यानंतर अल्पावधीतच या दलाची स्थापना केल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील प्रत्येक कुटुंब सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी सरकारची असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री विजय यांनी यावेळी सरकारच्या तीन प्रमुख प्राधान्यक्रमांची माहिती दिली. अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन, महिलांची सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था मजबूत करणे या मुद्द्यांवर सरकार विशेष भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिलांविरोधातील गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबले जाईल आणि दोषींना कठोर शिक्षा केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या विशेष दलाचे नेतृत्व पोलीस महानिरीक्षक के. भवानीश्वरी करणार आहेत. राज्यभरातील महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी विशेष मोहिमा, तक्रार निवारण, सायबर गुन्ह्यांवर लक्ष आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा विकसित करण्याचे काम हे दल करणार आहे.

दरम्यान, या पथकासाठी विविध विभागांतील १८ उपनिरीक्षकांची प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये सायबर गुन्हे शाखेतील अधिकारी, सोशल मीडिया सेलमधील कर्मचारी तसेच गुप्तचर विभागातील पोलिस कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे.

## छाप्यात १८ कोटींची मालमत्ता उघड

**हैदराबाद** : तेलंगणा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रस्ते व बांधकाम विभागातील एका मुख्य अभियंत्याविरोधात बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. एसीबीने मंगळवारी संबंधित अधिकाऱ्याचे कार्यालय, निवासस्थान तसेच त्यांचे नातेवाईक, सहकारी आणि कथित बेनामीदारांच्या एकूण १५ ठिकाणी एकाचवेळी छापे टाकले. या कारवाईदरम्यान सुमारे १७.९४ कोटी रुपयांची मालमत्ता आढळून आली. सेवाकाळात भ्रष्ट मार्गाने आणि संशयास्पद व्यवहारांद्वारे ही मालमत्ता जमा केल्याचा आरोप अधिकाऱ्यावर आहे. जप्त कागदपत्रे व आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू आहे.

# सह प्रकल्प अधिकाऱ्यांची बदली

### आरटीई प्रवेश प्रक्रियेतील वाद भोवला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागात सह प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यरत असलेले विलास दयाराम पाटील यांचा पदभार काढून त्यांची बदली करण्यात आल्याने विभागात विविध चर्चांना उधाण आले आहे. आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणी केंद्राशी संबंधित घडामोडींनंतर ही प्रशासकीय कारवाई करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

महापालिकेच्या आदेशानुसार, विलास पाटील यांच्याकडील सह प्रकल्प अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्काळ रद्द करण्यात आला आहे. त्यांची नियुक्ती आता शेवंताबाई खंडूजी जगताप वैदूवस्ती मुले-मुली शाळा क्रमांक ५८ येथे करण्यात आली असून तत्काळ रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी स्थापन करण्यात आलेल्या कागदपत्र पडताळणी केंद्रावर सचिव म्हणून विलास पाटील यांची नियुक्ती करण्यात आली होती. या केंद्राशी संबंधित एका प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्यानंतर संपूर्ण प्रकरण चर्चेत आले. उपआयुक्त (शिक्षण) ममता शिंदे यांच्या आदेशानुसार ही प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. महापालिकेची प्रतिमा मलिन होईल अशा घटनांबाबत प्रशासन गंभीर असल्याचे स्पष्ट होत असून, त्याच पार्श्वभूमीवर ही बदली करण्यात आल्याची चर्चा शिक्षण विभागात आहे. मात्र, या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा दोष किंवा जबाबदारी अधिकृत चौकशीतून निश्चित झालेली नसल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

### पुणे विभाग सर्वाधिक संकटात

# राज्यात धरणांतील पाणीसाठा चिंताजनक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : जून महिना सुरू होऊन दहा दिवस उलटले तरी राज्यातील बहुतांश भागात समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील धरणांमधील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचला असून नागरिक, शेतकरी आणि प्रशासनाची चिंता वाढली आहे. राज्यातील सर्व धरणांमध्ये सध्या केवळ २५.७९ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत हा साठा ३०.३६ टक्के होता. म्हणजेच एका वर्षात पाणीसाठ्यात सुमारे ५ टक्क्यांची घट झाली आहे.

मान्सूनचे राज्यात आगमन झाल्याची अधिकृत घोषणा झाली असली, तरी प्रत्यक्षात अनेक भागांमध्ये पावसाने अद्याप जोर धरलेला नाही. उष्णतेची तीव्रता कायम असून पिण्याचे पाणी, शेतीसाठीचे सिंचन, औद्योगिक वापर आणि जनावरांच्या पाण्याच्या गरजा याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्यावर संभाव्य दुष्काळाचे सावट अधिक गडद होत असल्याचे चित्र आहे.

महसूल विभागनिहाय आकडेवारी पाहता अमरावती विभागात सर्वाधिक ३८.५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यापाठोपाठ नागपूर विभागात ३७.५२ टक्के आणि कोकण विभागात ३१.५२ टक्के साठा आहे. तर पुणे विभागातील परिस्थिती सर्वाधिक गंभीर असून येथे केवळ १५.७९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच काळात पुणे विभागात २६.४५ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे वर्षभरात या विभागातील जलस्थितीत मोठी घसरण झाली आहे.नाशिक विभागात २७.०१ टक्के, तर छत्रपती संभाजीनगर विभागात २८.३४ टक्के पाणीसाठा नोंदविण्यात आला आहे. अनेक जिल्ह्यांतील पाणीपुरवठा योजना, सिंचन प्रकल्प आणि ग्रामीण भागातील जलस्रोतांवर याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील काही धरणांची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. खडकपूर्णा (बुलढाणा), बोरगाव अंजनपूर (बीड), रोशनपुरी (बीड), सिध्देश्वर (हिंगोली), किनवट (नांदेड), औराद, गुंजारगा, लिंबाळा, मदनसुरी, सिना-कोळेगाव (धाराशिव), बिंडगीहाळ (लातूर), भावली (नाशिक), तिल्लारी (कोल्हापूर), पिंपळगाव जोगे, घोड, गुंजवणी, लोणावळा टाटा (पुणे) आणि भीमा-उजनी (सोलापूर) यांसह सुमारे १८ धरणांमध्ये पाणीसाठा शून्यावर पोहोचला आहे. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मते, जूनच्या तिसऱ्या आठवड्यापासून मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. मात्र तोपर्यंत पावसाने जोरदार हजेरी लावली नाही, तर अनेक भागांमध्ये पाणीटंचाई अधिक तीव्र होऊ शकते. विशेषतः पुणे, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये परिस्थिती गंभीर होण्याची भीती आहे. राज्यातील नागरिक, शेतकरी आणि प्रशासनाचे लक्ष मान्सूनच्या पुढील वाटचालीकडे लागले असून, धरणांमध्ये नव्याने पाण्याची आवक सुरू होण्याची प्रतीक्षा सर्वांनाच आहे. पावसाचे आगमन जितके लांबेल, तितके पाणी व्यवस्थापनाचे आव्हान अधिक कठीण होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## बेकायदा औषध व्यवसायाला एफडीएने दिला दणका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने राज्यातील बेकायदेशीर औषध व्यवसायाविरोधात धडक मोहीम राबवत कोल्हापूर आणि पुण्यात मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एकूण २४ लाख ८७ हजार रुपयांचा औषधसाठा जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी कोल्हापूरमधील एका मेडिकल फर्मवर छापा टाकून १३ लाख ७६ हजार रुपयांची अॅलोपॅथिक औषधे जप्त केली. संबंधित औषधसाठ्यासाठी आवश्यक परवाने आणि वैध कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे तपासात आढळून आले. त्यामुळे औषध व सौंदर्यप्रसाधने कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. याचबरोबर पुण्यातील एका नामांकित औषध कंपनीच्या गोदामावरही धाड टाकण्यात आली. या कारवाईत ११ लाख ११ हजार रुपयांची 'शेड्युल-एच' श्रेणीतील औषधे जप्त करण्यात आली. प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री करता न येणाऱ्या या औषधांच्या जाहिरात आणि वितरणाबाबत नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने एफडीएने ही कारवाई केली.

अधिकाऱ्यांनी जप्त केलेल्या औषधांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले असून त्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. संबंधित प्रकरणांचा तपास सुरू असून दोषींवर कठोर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## संपादकीय

# व्याजदर, महागाई आणि बाजाराचा गणिती खेळ!

**अमेरिकेतील मजबूत रोजगार आकडेवारीनंतर शेअर बाजारात झालेली घसरण हा आधुनिक अर्थकारणातील महत्त्वाचा विरोधाभास ठरला आहे. चांगली आर्थिक कामगिरी, उच्च व्याजदरांची शक्यता आणि गुंतवणूकदारांच्या बदलत्या अपेक्षा यांचे गणित कसे बदलते, याचा वेध घेणारे हे वास्तव जागतिक बाजारांसाठीही महत्त्वाचे आहे.**

६ जून २०२६ रोजी अमेरिकेच्या शेअर बाजारात झालेली मोठी घसरण जागतिक गुंतवणूकदारांसाठी धोक्याची घंटा ठरली. तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश असलेल्या नॅस्डॅक निर्देशांकात एका दिवसात ४ टक्क्यांहून अधिक घसरण झाली, तर एस अँड पी ५०० निर्देशांक २.६ टक्क्यांनी आणि डाऊ जोन्स इंडस्ट्रियल अ ॅव्हरेज १.३५ टक्क्यांनी खाली आला. ही घसरण कोणत्याही आर्थिक संकटामुळे किंवा युद्धजन्य परिस्थितीमुळे नव्हे, तर अमेरिकेतील अपेक्षेपेक्षा मजबूत रोजगार आकडेवारीमुळे झाली. ही घटना वित्तीय बाजारपेठेतील विरोधाभास अधोरेखित करते. अर्थव्यवस्थेसाठी चांगली बातमी ही नेहमीच शेअर बाजारासाठी चांगली असेल, असे नाही. अमेरिकेच्या कामगार विभागाने जाहीर केलेल्या रोजगार अहवालानुसार एप्रिल महिन्यात रोजगारनिर्मितीचा वेग अपेक्षेपेक्षा जास्त राहिला. बेरोजगारीचा दर तुलनेने कमी पातळीवर कायम राहिला आणि रोजगार बाजारातील मजबुतीचे संकेत मिळाले. सामान्यतः अशा प्रकारचे आकडे आर्थिक प्रगतीचे द्योतक मानले जातात. रोजगार वाढला की ग्राहकांची क्रयशक्ती वाढते, उद्योगधंद्यांना चालना मिळते आणि आर्थिक वाढीला आधार मिळतो. मात्र, यावेळी गुंतवणूकदारांनी या आकडेवारीकडे वेगळ्या नजरेने पाहिले. यामागील प्रमुख कारण म्हणजे अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेली फेडरल रिझर्व्ह. गेल्या काही वर्षांपासून महागाई नियंत्रणात आणण्यासाठी फेडरल रिझर्व्हने व्याजदर उच्च पातळीवर ठेवले आहेत. बाजारातील अनेक गुंतवणूकदारांना २०२६ मध्ये व्याजदर कपातीची अपेक्षा होती. परंतु मजबूत रोजगार अहवालामुळे अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचे संकेत मिळाले. त्यामुळे महागाईचा दबाव कायम राहू शकतो आणि फेडरलला व्याजदर कमी करण्याची घाई राहणार नाही, अशी भीती निर्माण झाली. व्याजदर वाढल्यास किंवा दीर्घकाळ उच्च राहिल्यास त्याचा सर्वाधिक परिणाम तंत्रज्ञान कंपन्यांवर होतो. कारण या कंपन्यांचे मूल्यांकन भविष्यातील अपेक्षित नफ्यावर आधारित असते. उच्च व्याजदरांमुळे भविष्यातील उत्पन्नाचे वर्तमान मूल्य कमी होते आणि गुंतवणूकदार अधिक सुरक्षित पर्यायांकडे वळतात. परिणामी कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमिकंडक्टर आणि उच्च-वाढीच्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी विक्री झाली. याच काळात डिजिटल मालमत्तांनाही मोठा फटका बसला. बिटकॉइनच्या किमतीत लक्षणीय घसरण झाली. गुंतवणूकदारांनी जोखीम असलेल्या मालमत्तांमधून पैसे काढून तुलनेने सुरक्षित गुंतवणूक पर्यायांकडे मोर्चा वळवला. क्रिप्टोकरन्सी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील शेअर्स हे दोन्ही उच्च जोखमीचे मानले जात असल्याने त्यांच्यावर दबाव वाढला. अर्थतज्ज्ञांच्या मते, ही घसरण संपूर्ण आर्थिक संकटाचे लक्षण नाही. उलटपक्षी, बाजाराने अतिआशावादी अपेक्षांचे पुनर्मूल्यांकन करण्यास सुरुवात केल्याचे हे संकेत आहेत. गेल्या दोन वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये प्रचंड तेजी पाहायला मिळाली. अनेक कंपन्यांचे बाजारमूल्य त्यांच्या प्रत्यक्ष आर्थिक कामगिरीच्या तुलनेत झपाट्याने वाढले. त्यामुळे काही विश्लेषकांनी या परिस्थितीची तुलना २००० च्या दशकाच्या सुरुवातीच्या डॉट-कॉम बबलशी करण्यास सुरुवात केली आहे. तथापि, आजची परिस्थिती डॉट-कॉम युगापेक्षा वेगळी आहे. त्या काळातील अनेक इंटरनेट कंपन्या नफ्यात नव्हत्या, तर आजच्या आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्या अब्जावधी डॉलर्सचा नफा कमावत आहेत. त्यामुळे सध्याची घसरण ही मूल्यांकनातील सुधारणा असू शकते. तरीही गुंतवणूकदारांनी केवळ उत्साहाच्या भरात गुंतवणूक करण्याऐवजी कंपन्यांच्या मूलभूत आर्थिक स्थितीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. या घडामोडींचा परिणाम अमेरिकेपुरता मर्यादित राहणार नाही. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि वित्तीय बाजारपेठ म्हणून अमेरिकेतील निर्णयांचा परिणाम भारतासह जगभरातील बाजारांवर होतो. अमेरिकन व्याजदर दीर्घकाळ उच्च राहिल्यास परदेशी गुंतवणूक प्रवाहावर परिणाम होऊ शकतो. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधील गुंतवणूक कमी होण्याची शक्यता वाढते आणि चलनविषयक अस्थिरताही निर्माण होऊ शकते. भारतीय गुंतवणूकदारांसाठीही या घडामोडी महत्त्वाच्या आहेत. जागतिक बाजारपेठांमधील अस्थिरतेचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर होऊ शकतो. त्यामुळे अल्पकालीन चढउतारांकडे दीर्घकालीन गुंतवणूक धोरणावर भर देणे आवश्यक आहे. आर्थिक मूलभूत घटक मजबूत असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणे आणि जोखीम व्यवस्थापनाला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. ६ जून २०२६ च्या घसरणीने एक महत्त्वाचा धडा दिला आहे. मजबूत अर्थव्यवस्था आणि मजबूत शेअर बाजार हे नेहमीच एकाच दिशेने जातील असे नाही. आजच्या वित्तीय जगात व्याजदर, महागाई आणि गुंतवणूकदारांच्या अपेक्षा या घटकांचा बाजारावर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे आर्थिक आकडेवारीकडे सकारात्मक किंवा नकारात्मक म्हणून पाहण्याऐवजी तिचे व्यापक परिणाम समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. फेडरल रिझर्व्हची भूमिका, महागाईचे आकडे आणि रोजगार बाजारातील स्थिती यावर जागतिक वित्तीय बाजारांचे भवितव्य मोठ्या प्रमाणात अवलंबून असेल.

### पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या प्रदूषणात भर

# 600 एमएलडी सांडपाणी थेट नद्यांमध्ये

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातून दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे एक हजार एमएलडी घरगुती सांडपाण्यापैकी तब्बल ६०० एमएलडी सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीपात्रात सोडले जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शहरातील नद्यांच्या वाढत्या प्रदूषणामध्ये महापालिकेचाही मोठा वाटा असल्याचे स्पष्ट होत आहे.

महापालिका पवना नदीतून दररोज ५५० एमएलडी पाणी उचलून त्यावर प्रक्रिया करून नागरिकांना पुरवठा करते. याशिवाय एमआयडीसीकडून ३० एमएलडी आणि आंद्रा योजनेतून ९० एमएलडी पाणी घेतले जाते. अशा प्रकारे महापालिकेकडून दररोज सुमारे ६७० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. तर बोअरवेल, विहिरी, खासगी टँकर आणि पुनर्वापरित पाण्याच्या वापरामुळे शहरातील एकूण पाणी वापर सुमारे एक हजार एमएलडीपर्यंत पोहोचतो. परिणामी तितकेच सांडपाणीही तयार होते.

महापालिकेकडे शहरभरात २२ मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्रे (एसटीपी) असून त्यांची एकूण क्षमता ४२३ एमएलडी आहे. प्रत्यक्षात दररोज सुमारे ४०० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्यामुळे उर्वरित ६०० एमएलडी सांडपाणी प्रक्रिया न होता थेट नदीपात्रात मिसळत असल्याचे चित्र आहे.

अनेक ठिकाणी ड्रेनेज लाईन फुटल्याने किंवा अडथळ्यांमुळे सांडपाणी नाले आणि रस्त्यांमार्गे थेट नद्यांमध्ये पोहोचते. काही पर्यावरणप्रेमींनी नदीकाठावरील ड्रेनेज लाईन जाणीवपूर्वक फोडल्या जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच काही एसटीपी केंद्रांतून प्रक्रिया न केलेले सांडपाणी रात्रीच्या वेळी नदीत सोडले जात असल्याच्या तक्रारीही वारंवार पुढे येत आहेत. या सर्व कारणांमुळे पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीपात्रात जलपर्णीचे प्रमाण वाढले असून पाण्याची गुणवत्ता गंभीररीत्या खालावली आहे. अनेक ठिकाणी दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव, पांढरा फेस आणि मासेमृत्यूच्या घटनाही घडत आहेत. परिणामी शहरातील नद्यांची अक्षरशः गटारगंगा झाली असल्याची टीका पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

स्वच्छ सर्वेक्षण अभियानातही या परिस्थितीचा फटका महापालिकेला बसत आहे. प्रक्रिया न करता सांडपाणी नदीत सोडल्याचे निरीक्षण स्वच्छ भारत अभियानाच्या पथकाने नोंदविल्याने महापालिकेच्या गुणांमध्ये मोठी घट होत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून महापालिकेकडून २० एमएलडी क्षमतेचे नवीन एसटीपी उभारण्यात येत आहे. याशिवाय ४३५ एमएलडी क्षमतेची आणखी १२ एसटीपी केंद्रे उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. औद्योगिक सांडपाण्यासाठी स्वतंत्र सीईटीपी उभारण्याचाही प्रस्ताव आहे. सध्या प्रक्रिया केलेले ७० ते ८० एमएलडी पाणी उद्याने आणि औद्योगिक वापरासाठी दिले जात असून त्यातून महापालिकेला दरमहा १० ते १२ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते.

जलसंपदा विभागाच्या नियमानुसार जितके पाणी उचलले जाते तितकेच प्रक्रिया करून नदीत सोडणे बंधनकारक आहे. मात्र तसे न केल्याने महापालिकेवर दरवर्षी सुमारे १० कोटी रुपयांचा दंड आकारला जात आहे. आतापर्यंत हा दंड ११० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून त्याबाबत महापालिकेने लवादाकडे धाव घेतली आहे.

# पुण्यात एफडीएच्या कारवाईचा दणका

### ४७ लाखांचा दुग्धजन्य पदार्थांचा साठा जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत पुण्यात भेसळीचा संशय असलेल्या दुग्धजन्य पदार्थांवर मोठी कारवाई करत तब्बल ४७ लाख ३६ हजार रुपयांचा साठा जप्त केला. सोमवार पेठ, बुधवार पेठ, शुक्रवार पेठ, कोथरूड आणि हडपसर परिसरातील १७ ठिकाणी धाडी टाकून ही कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान खवा, पनीर, तूप आणि चीजसदृश पदार्थांचे एकूण ३५ नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या साठ्यामध्ये २ हजार ८०६ किलो पनीर, १३ हजार १२७ किलो खवा, १३८ किलो चीज ॲनालॉग आणि ९६० किलो तुपाचा समावेश आहे. या नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यात येणार असून अहवालानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे.

दरम्यान, सातारा जिल्ह्यातील माण, जावळी आणि कराड तालुक्यांमध्येही एफडीएने तूप, फरसाण आणि शेव विक्रेत्यांवर धाडी टाकल्या. या कारवाईत चार नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून सुमारे २ लाख ३८ हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. राज्यभरात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांविरोधात १ ते ५ जून या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत १९५ ठिकाणी छापे टाकण्यात आले. या कारवाईत १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपये किमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला असून १९२ जणांना अटक करण्यात आली आहे.

५ जून रोजी धाराशिव जिल्ह्यातील परांडा येथे १ कोटी २ लाख ६७ हजार २६३ रुपये किमतीचा प्रतिबंधित माल जप्त करून दोघांना अटक करण्यात आली. तसेच ४ जून रोजी समृद्धी महामार्गावरील सावंगी टोल नाका येथे ६० लाख ५० हजार रुपयांचा माल आणि वाहने जप्त करण्यात आली. धुळे येथे ३ जून रोजी झालेल्या कारवाईत २३ लाख ५० हजार रुपयांचा प्रतिबंधित साठा ताब्यात घेण्यात आला.

पिंपरी-चिंचवडमधील कारवाईत सहा जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून विविध कायद्यांअंतर्गत राज्यभरात १९२ आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती एफडीएने दिली.

# पिंपरी-चिंचवडमधील शाळांना पाठ्यपुस्तकांचे वितरण सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील महापालिका, शासकीय, खासगी अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तकांच्या संचांचे वितरण सोमवारपासून (दि. ८) सुरू करण्यात आले. वितरणाच्या पहिल्याच दिवशी आकुर्डी आणि पिंपरी येथील केंद्रांवर मुख्याध्यापकांनी पुस्तकांचे संच घेण्यासाठी गर्दी केली.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या आदेशानुसार आणि बालभारती, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेली पाठ्यपुस्तके ८ ते १२ जून या कालावधीत वितरित करण्यात येणार आहेत. या वितरणासाठी आकुर्डी येथील वसंतदादा पाटील महापालिका शाळा आणि पिंपरी वाघिरे येथील कर्मवीर भाऊराव पाटील महापालिका शाळा ही केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.



शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभीच विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके पोहोचावीत आणि शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रत्येक विद्यार्थ्याकडे आवश्यक पुस्तके उपलब्ध असावीत, यासाठी शिक्षण विभागाने विशेष नियोजन केले आहे.

दरम्यान, खासगी अनुदानित शाळांमधील स्वयंअर्थसहाय्यित तुकड्यांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जाणार नसल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. सर्व मुख्याध्यापकांनी निश्चित वेळापत्रकानुसार पाठ्यपुस्तकांचा ताबा घेऊन विद्यार्थ्यांना वेळेत वाटप करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आजपासून १४ दिवस जमावबंदी लागू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत १४ दिवसांसाठी जमावबंदी लागू करण्यात आली आहे. हा आदेश १० जूनच्या मध्यरात्रीपासून २३ जूनच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

पोलिस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) आणि (३) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी केला आहे. आदेशानुसार, स्फोटके, ज्वलनशील पदार्थ, दगड, शस्त्रे, तलवारी, भाले, काठ्या, बंदुका तसेच इजा पोहोचविण्यासाठी वापरता येणाऱ्या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही व्यक्तीच्या किंवा नेत्यांच्या प्रतिमांचे प्रदर्शन, पुतळे उभारणे अथवा त्यांचे दहन करण्यास बंदी घालण्यात आली आहे. घोषणाबाजी करणे, ध्वनीक्षेपक अथवा वाद्यांचा वापर करून सार्वजनिक शांततेला बाधा आणणे, चिथावणीखोर भाषणे करणे किंवा समाजात तणाव निर्माण होईल अशा कृतींवरही निर्बंध घालण्यात आले आहेत. याशिवाय पाचपेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई आहे.

# अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा बुलडोजर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहरातील सरकारी व खासगी जागांवरील अतिक्रमणांविरोधात पिंपरी-चिंचवड महापालिकेने धडक मोहीम सुरू केली असून अनधिकृत धार्मिक बांधकामांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. या मोहिमेअंतर्गत कुदळवाडी, चिखली आणि पवार वस्ती परिसरातील ११ अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली.

महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने कडेकोट पोलीस बंदोबस्तात ही कारवाई केली. संबंधित बांधकामांमध्ये मंदिरे आणि मशिदींचा समावेश होता. मात्र, ही कारवाई कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून केवळ अनधिकृत बांधकामांविरोधातील मोहिमेचा भाग असल्याचे महापौर रवी लांडगे यांनी स्पष्ट केले.



शहरातील सरकारी जमिनी बळकावून उभारण्यात आलेल्या धार्मिक स्थळांसह इतर सर्व प्रकारच्या अतिक्रमणांवर कारवाई सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. नियमबाह्य ठरणाऱ्या चर्च, बुद्ध विहार किंवा अन्य कोणत्याही धार्मिक बांधकामांवरही भविष्यात कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, कारवाईदरम्यान काही ठिकाणी स्थानिकांकडून विरोध करण्यात आला. काही भागांत तणावाचे वातावरण निर्माण झाले असून दगडफेकीच्या घटनाही घडल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत कारवाई शांततेत पूर्ण केल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. महापालिकेने शहरातील अनधिकृत बांधकामांवर कठोर भूमिका कायम ठेवली असून आगामी काळात अतिक्रमण हटाव मोहीम आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

# निगडीत बनावट ताडीचा साठा जप्त; दोघांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** निगडी येथील ट्रान्सपोर्ट नगर परिसरात मानवी आरोग्यास अत्यंत घातक ठरणारी बनावट व भेसळयुक्त ताडी विक्री करणाऱ्या टोळीचा गुन्हे शाखेच्या दारूबंदी पथकाने पर्दाफाश केला. या कारवाईत दोघांना अटक करण्यात आली असून दोन आरोपी फरार आहेत.

मौनेश यक्कप्पा गुतेदार (वय २४, रा. देहूगाव) आणि लक्ष्मण गुडाप्पा फुलसुरे (वय २६, रा. देहूगाव) यांना अटक करण्यात आली आहे. तर न्यायतबी मेहबुब कोरबु (रा. निगडी) आणि विजय भंडारी हे फरार आहेत.

गुन्हे शाखेच्या दारूबंदी पथकाने रामदेव बाबा हॉटेललगत असलेल्या दुकान क्रमांक २ वर छापा टाकला. तेथे क्लोरल हायड्रेट हे मानवी जीवितास अपायकारक रसायन मिसळलेली २९ हजार २४० रुपयांची बनावट ताडी जप्त करण्यात आली. फरार आरोपी विजय भंडारी याने ताडी तयार करण्यासाठी हे रसायन पुरवल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

पोलीस शिपाई उद्धव खेडकर यांच्या फिर्यादीवरून निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक पुल्ली पुढील तपास करीत आहेत.

**तळेगावात रिक्षातून दारू वाहतूक**

**तळेगाव दाभाडे :** रिक्षातून देशी व विदेशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला गुन्हे शाखा युनिट-४ च्या पथकाने अटक केली. गणेश उत्तम खिलारे (वय २८, रा. मावळ लँड सोसायटी, तळेगाव दाभाडे) असे आरोपीचे नाव आहे.

तळेगाव स्टेशन ते डी-मार्ट रोडवर रिक्षातून दारू वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी एमएच १४ एलएस ५४३७ या रिक्षाची तपासणी केली असता पॉवर लाईम पंच कंपनीची देशी दारू तसेच विविध प्रकारची विदेशी दारू असा ८ हजार १८४ रुपयांचा मुद्देमाल आढळून आला.

पोलीस कर्मचारी बाबाराजे मुंडे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक सुरडकर पुढील तपास करीत आहेत.

**चाकणमध्ये दुचाकीवरून दारू वाहतूक**

**चाकण :** दुचाकीवरून देशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीला गुन्हे शाखेच्या युनिट-३ पथकाने चाकण परिसरात अटक केली. कारवाईदरम्यान दारूसह दुचाकी असा ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रामेश्वर नाथा गंगाधरे (वय ३४, रा. देहूफाटा, आळंदी, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मेदनकरवाडी फाटा कमानीजवळ संशयास्पद हालचाली सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्या ॲक्टिव्हा दुचाकीवर पॉवर लाईम पंच कंपनीच्या देशी दारूच्या २०० सीलबंद बाटल्या आढळून आल्या. या बाटल्यांची किंमत ८ हजार रुपये असून दुचाकीची किंमत ४० हजार रुपये आहे. पोलीस शिपाई सुधीर दांगट यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

**घोरवाडी रेल्वे स्टेशनजवळ दारू विक्री**

**तळेगाव दाभाडे :** घोरवाडी रेल्वे स्टेशनलगत बेकायदेशीर हातभट्टीची दारू विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला तळेगाव दाभाडे पोलिसांनी रंगेहात अटक केली. बबन शंकर गायकवाड (वय ५९, रा. शेलारवाडी, ता. मावळ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. घोरवाडी रेल्वे स्टेशनजवळील कच्च्या रस्त्यावर झाडाखाली आरोपी हातभट्टीची दारू विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून आरोपीकडून १८ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. जप्त दारूची किंमत १ हजार ८० रुपये असून ती आरोग्यास अपायकारक असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस कर्मचारी दिपक मोरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

# तळवडेत घरफोडी; साडेतीन लाखांचे दागिने लंपास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तळवडे परिसरात बंद घर फोडून साडेतीन लाखांहून अधिक किमतीचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

मोमीन युसुफ तांबोळी (वय २६, रा. रुपनगर, तळवडे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

राकेश सरदार बिराजदार (वय ३९, रा. सरस्वती हौसिंग सोसायटी, रुपनगर) हे २९ ते ३० मे दरम्यान घराबाहेर गेले असताना ही घटना घडली. आरोपीने घरात प्रवेश करून कपाटातील ४ तोळे ६ ग्रॅम



वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले. चोरीस गेलेल्या दागिन्यांची किंमत ३ लाख ६८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

फिर्यादीच्या तक्रारीवरून चिखली पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### प्राणघातक हल्ल्यात दोघे जण जखमी

**भिगवण :** भिगवण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवघ्या दोन दिवसांत घडलेल्या दोन गंभीर घटनांमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. जमिनीच्या वादातून एका ज्येष्ठ नागरिकावर सुरीने हल्ला करण्यात आला, तर दुसऱ्या घटनेत हॉटेलमध्ये दारूच्या बिलाच्या कारणावरून एका तरुणावर लोखंडी गजाने प्राणघातक हल्ला करण्यात आला. दोन्ही प्रकरणांमध्ये जखमींवर उपचार सुरू असून भिगवण पोलिसांनी गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मदनवाडी येथे जमिनीची वाटणी आणि कागदपत्रांवरील सह्यांच्या वादातून कौटुंबिक संघर्ष उफाळून आला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून दोन सावत्र भावांनी आपल्या ६५ वर्षीय सख्ख्या भावावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा आरोप आहे. दरम्यान, दुसरी घटना डिकसळ येथील 'हॉटेल गिरीजा'मध्ये घडली. येथे काही तरुणांमध्ये दारूच्या बिलावरून वाद झाला. फुकटची दारू पिऊन पैसे देण्यास नकार दिल्याने झालेल्या वादातून एका तरुणाच्या डोक्यात लोखंडी गजाने वार करण्यात आला. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

### बंधाऱ्याविरोधात ग्रामस्थांचा महामोर्चा

**लोणी काळभोर :** मुळा-मुठा नदीपात्रात एमआयटी संस्थेकडून उभारण्यात आलेल्या बंधाऱ्याविरोधात सोमवारी लोणी काळभोर परिसरात रिपब्लिकन सेनेच्या नेतृत्वाखाली शेकडो ग्रामस्थ, शेतकरी, महिला आणि युवकांनी भव्य महामोर्चा काढत तीव्र आंदोलन केले. बंधारा तात्काळ हटवावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी प्रशासनाला देण्यात आला. बंधाऱ्यामुळे मुळा-मुठा नदीचा नैसर्गिक प्रवाह अडथळला गेला असून त्यामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणात जलपर्णी, कचरा आणि गाळ साचत असल्याचा आरोप करण्यात आला.

## शिवभक्तांनी अनुभवला इतिहासाचा जिवंत साक्षात्कार

# शिवनेरी पायथ्याशी शिवराज्याभिषेक सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**जुन्नर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी भव्य आणि उत्साहपूर्ण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हजारो शिवभक्त, इतिहासप्रेमी, विविध सामाजिक संस्था आणि युवक संघटनांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. शिवजन्मभूमी असलेल्या शिवनेरी परिसरात भगव्या पताकांनी आणि जयघोषांनी वातावरण शिवमय झाले होते. शिवराज्याभिषेक हा स्वराज्याच्या स्थापनेचा आणि मराठी अस्मितेचा ऐतिहासिक क्षण असल्याने या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सोहळ्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, अभिवादन आणि ढोल-ताशांच्या गजरात करण्यात आली. विविध मान्यवरांनी महाराजांच्या कार्याचा गौरव करत स्वराज्याच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. शिवकालीन पोशाखातील युवक-युवती, मावळ्यांच्या वेशभूषेतील पथके आणि पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी रायगडावर झाला होता. या ऐतिहासिक घटनेमुळे हिंदवी स्वराज्याला सार्वभौमत्वाची अधिकृत मान्यता मिळाली आणि मराठा साम्राज्याच्या वैभवशाली पर्वाची सुरुवात झाली. राज्याभिषेक हा केवळ राजकीय सोहळा नव्हता, तर स्वाभिमान, स्वराज्य आणि लोककल्याणकारी शासनव्यवस्थेची घोषणा होती.

यंदाच्या कार्यक्रमात शिवनेरी परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासावरही भर देण्यात आला. पर्यटनाच्या दृष्टीने शिवनेरी आणि जुन्नर परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी रस्ते, पार्किंग, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा आणि पर्यटकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उभारण्याबाबत चर्चा करण्यात आली.

शिवनेरी हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी शासनाकडून विविध उपक्रम राबविले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

इतिहास आणि संस्कृतीचा वारसा जपत नव्या पिढीपर्यंत शिवचरित्र पोहोचविण्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला. शिवनेरीच्या पायथ्याशी पार पडलेला हा शिवराज्याभिषेक सोहळा शिवभक्तांसाठी प्रेरणादायी आणि अविस्मरणीय ठरला.

## चासकमान कालव्याच्या अस्तरीकरणाविरोधात एल्गार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर :** चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणाच्या कामाविरोधात शिरूर तालुक्यातील दहा गावांतील शेतकरी एकवटले असून त्यांनी शिक्रापूर-पाबळ मार्गावर रास्ता रोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. कालव्याचे अस्तरीकरण झाल्यास भूजल पुनर्भरण थांबेल, विहिरी आणि बोअरवेल्स कोरड्या पडतील तसेच शेती, पिण्याचे पाणी आणि स्थानिक पर्यावरण गंभीर संकटात सापडेल, असा आरोप आंदोलक शेतकऱ्यांनी केला.

या आंदोलनात पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. "स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता प्रशासनाने हे काम पुढे नेण्याचा प्रयत्न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल," असा इशाराही आंदोलकांनी दिला. काही काळ वाहतूक ठप्प झाल्याने मार्गावरील वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, सध्या मातीच्या कालव्यामधून झिरपणारे पाणी परिसरातील विहिरी, कूपनलिका आणि भूजलस्तर टिकवून ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावते. कालव्याला काँक्रीट अस्तरीकरण केल्यास ही नैसर्गिक पुनर्भरण प्रक्रिया थांबेल. परिणामी भविष्यात शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दुसरीकडे, पाटबंधारे विभागाचे म्हणणे आहे की कालव्याचे अस्तरीकरण केल्यामुळे पाण्याची गळती कमी होईल, सिंचन कार्यक्षमता वाढेल आणि शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचण्यास मदत होईल. चासकमान प्रकल्पाच्या कालवा व्यवस्थेच्या आधुनिकीकरणासाठी टप्प्याटप्प्याने कामे सुरू असून कालव्याच्या काही भागांमध्ये अस्तरीकरण पूर्ण झाले आहे.

## वीर योजनेमुळे सासवडकरांना होणार नियमित पाणीपुरवठा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सासवड :** पुरंदर तालुक्याचे मुख्यालय असलेल्या सासवड शहराच्या दीर्घकालीन पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उभारण्यात आलेल्या वीर जलपुरवठा योजनेचा शुभारंभ करण्यात आला आहे. या योजनेमुळे शहरातील हजारो नागरिकांना नियमित आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सासवड शहराची वाढती लोकसंख्या, विस्तारत असलेल्या वसाहती आणि वाढती पाण्याची मागणी लक्षात घेऊन ही योजना राबविण्यात आली आहे. वीर धरणातून पाणी उचलून आधुनिक जलवाहिन्या, पंपगृहे, जलशुद्धीकरण सुविधा आणि साठवण टाक्यांच्या माध्यमातून शहरात पाणी पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे भविष्यातील गरजाही



लक्षात घेऊन मजबूत पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

सासवड शहराला गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. अनेक भागांमध्ये टँकरवर अवलंबून राहावे लागत होते. नव्या योजनेमुळे नागरिकांना अधिक नियमित, नियोजित आणि दाबाने पाणीपुरवठा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

योजनेच्या उद्घाटनप्रसंगी लोकप्रतिनिधींनी ही योजना केवळ पाणीपुरवठा प्रकल्प नसून सासवडच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. शहराच्या वाढत्या नागरीकरणाला चालना देण्यासाठी पाणी, रस्ते आणि सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधांची उभारणी आवश्यक असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

दरम्यान, राज्यभरात विविध शहरांमध्ये पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांना गती देण्यात येत असून केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. पुणे जिल्ह्यातील विविध भागांमध्येही जलसुविधांच्या विस्तारावर भर दिला जात आहे. वीर जलयोजना कार्यान्वित झाल्यानंतर सासवड शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम होईल, तसेच भविष्यातील लोकसंख्या वाढ लक्षात घेता शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास प्रशासन आणि नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

## साठ गुंठ्यांत २०० केशर आंब्यांची बाग

### थोरांदळेतील शेतकऱ्याचा आदर्श प्रयोग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे येथील शेतकरी सुहास खंडू पोखरकर यांनी अवघ्या ६० गुंठे क्षेत्रात केशर जातीच्या २०० आंब्यांच्या झाडांची यशस्वी फळबाग उभारून परिसरातील शेतकऱ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे. आधुनिक तंत्रज्ञान, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर त्यांनी हा प्रयोग यशस्वी करून दाखविला आहे.

डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यावरील घोड शाखेच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या थोरांदळे गावात सुहास पोखरकर यांनी २०१८ मध्ये केशर आंब्याची लागवड केली. ६० गुंठे क्षेत्रात २०० झाडे लावत ठिबक सिंचनाची व्यवस्था केली. यंदा तिसऱ्यांदा आंब्यांची तोडणी सुरू असून झाडांवर दर्जेदार फळांचे भरघोस उत्पादन आले आहे. सध्या बागेत



आंबा तोडणीची लगबग सुरू आहे. सुहास पोखरकर आणि त्यांचे कुटुंबीय आंब्यांची वर्गवारी व पॅकिंगच्या कामात व्यस्त आहेत. उत्कृष्ट दर्जामुळे या आंब्यांना बाजारपेठेत चांगली मागणी असून मुंबई बाजारात डझनाला २५० ते ३०० रुपये दर मिळत आहे.

परिसरातील हवामान आणि उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करत ठिबक सिंचन, संतुलित खत व्यवस्थापन आणि रोगनियंत्रणाच्या उपाययोजनांमुळे झाडांची वाढ चांगली झाली आहे. त्यामुळे उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली आहे. कमी क्षेत्रातूनही फळबाग शेतीच्या माध्यमातून चांगले उत्पन्न मिळू शकते, हे या प्रयोगातून सिद्ध झाले आहे. पारंपरिक शेतीसोबत फळबाग लागवडीकडे वळल्यास शाश्वत उत्पन्नाचा मार्ग खुला होऊ शकतो, असे सुहास पोखरकर यांनी सांगितले. आंबा हंगाम सध्या जोमात सुरू असून थोरांदळे येथील ही केशर आंबा बाग परिसरातील शेतकरी आणि कृषी अभ्यासकांचे लक्ष वेधून घेत आहे.

## मान्सूनपूर्व पावसाची हजेरी; शेतकऱ्यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी देवकर :** इंदापूर तालुक्यातील पळसदेव परिसरात गेल्या दोन दिवसांपासून मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून रस्त्यांवरील खड्डे पाण्याने भरून वाहताना दिसत आहेत.

पळसदेव, काळेवाडी, माळेवाडी, बांडेवाडी, डाळज आदी भागांत शनिवार व रविवारी सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. या पावसामुळे उन्हाच्या तीव्र झळांपासून काहीसा दिलासा मिळाला असला, तरी वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले आहे. मका, केळी, आंबा, डाळिंब यांसह विविध पिकांवर वादळी वाऱ्याचा फटका बसला आहे. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून अनेक पिके जमिनीवर आडवी झाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था 'कभी खुशी, कभी गम' अशी



झाली आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेल्या तीव्र उष्णतेमुळे शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. नदीपात्रातील गाळ काढून पाणी उपलब्ध करून देणे, दिवसरात्र शेतात थांबणे आणि सिंचनासाठी प्रयत्न करणे अशी धावपळ सुरू होती. त्यातच वीजपुरवठ्याचा कालावधी आठ तासांवरून सहा तासांवर आल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली होती. अशा परिस्थितीत मान्सूनपूर्व पावसाच्या आगमनामुळे परिसरातील शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळाला असून आता सर्वांचे लक्ष मान्सूनच्या नियमित आगमनाकडे लागले आहे.

## अधिकमासानिमित्त भव्य त्रिदिनी सप्ताहाचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्टच्या वतीने अधिकमासानिमित्त भव्य त्रिदिनी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक पर्वणीमध्ये विविध आध्यात्मिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर यांनी केले आहे.

या सप्ताहास गुरुवार, ११ जून रोजी प्रारंभ होणार असून रविवार, १४ जून रोजी हरिनाम गजरात सांगता होणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज सकाळी काकडा, भजन, दुपारी महिला भजनी मंडळाचे भजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकीर्तन सेवा तसेच त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच रात्री १० ते १२ या वेळेत जागराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सप्ताहात प्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तनसेवा होणार आहे. पहिल्या दिवशी भागवत महाराज कचरे, दुसऱ्या दिवशी मल्लेश महाराज चिंतले, तिसऱ्या दिवशी सोपान महाराज शिंदे यांचे कीर्तन होईल. तर काल्याचे कीर्तन ह.भ.प. महेंद्र महाराज नलावडे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्ट, थोरल्या पादुका तरुण भजनी मंडळ, जिर्णोद्धार समिती, देवस्थान ट्रस्ट वडमुखवाडी तसेच स्वकर्म सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

अधिकमासाच्या पुण्यपर्व काळात आयोजित या धार्मिक पर्वणीत भाविकांनी सहभागी होऊन आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड. विष्णू तापकीर यांनी केले आहे.

## पोलीस उपनिरीक्षकपदी चौघे जण दाखल



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील चार युवा अधिकारी वर्षभराचे कठोर आणि जिद्दीचे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून पोलीस उपनिरीक्षक म्हणून महाराष्ट्र पोलीस दलात दाखल झाले आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पोलीस उपनिरीक्षक प्रशांत बबन दांगट (निरगुडसर), भाग्यश्री जगन्नाथ जाधव (जाधववाडी), श्वेता सुखदेव करंडे (काठापूर बुद्रूक) आणि स्वप्निल मच्छिंद्र हिंगे (अवसरी बुद्रूक) यांनी आपल्या मेहनत, चिकाटी, समर्पण आणि कर्तृत्वाच्या बळावर हे यश मिळवले आहे.

ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी या चारही अधिकाऱ्यांचे यश प्रेरणादायी ठरत आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी एक आदर्श निर्माण केला असून कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल आंबेगाव तालुक्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत असून तालुकाभर आनंदाचे वातावरण आहे.

## १२ जूनला आरक्षण सोडत, इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू

# इंदापूरात ग्रामपंचायत निवडणुकांची चाहूल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इंदापूर :** तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचे बिगुल वाजण्यास सुरुवात झाली असून १२ जून रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरक्षण जाहीर होताच गावागावातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असल्याने इच्छुक उमेदवार आणि स्थानिक गटांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने २०२४, २०२५ आणि २०२६




मध्ये मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींसाठी सदस्य पदांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार इंदापूर तालुक्यात तहसील कार्यालयात १२ जून रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींची मुदत संपलेली असून आगामी निवडणुकांसाठी इच्छुकांनी तयारीला सुरुवात केली आहे. सरपंच, सदस्य तसेच विविध प्रवर्गांतील जागांचे आरक्षण निश्चित झाल्यानंतरच उमेदवारांचे अंतिम चित्र स्पष्ट होणार असल्याने राजकीय वातावरण तापू लागले आहे.

इंदापूर तालुक्यात सध्या ११६ ग्रामपंचायती कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता मिळविण्यासाठी विविध राजकीय पक्षांसह स्थानिक आघाड्यांनी हालचाली वाढवल्या आहेत. गेल्या काही महिन्यांत तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय फेरबदल झाले होते. त्याचा परिणाम ग्रामपंचायत निवडणुकांवरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, काँग्रेस तसेच विविध स्थानिक गट सक्रिय झाले आहेत.

आरक्षण जाहीर झाल्यानंतर गावागावातील संभाव्य उमेदवारांचे गणित बदलणार असून अनेक ठिकाणी नवीन चेहरे पुढे येण्याची शक्यता आहे. महिलांसाठी, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि सर्वसाधारण प्रवर्गातील जागांचे आरक्षण निश्चित झाल्यानंतर निवडणुकीच्या हालचालींना आणखी वेग येणार आहे.


दरम्यान, आरक्षण सोडतीनंतर राज्य निवडणूक आयोगाकडून पुढील निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची अपेक्षा असून गावपातळीवरील राजकारण पुन्हा एकदा रंगतदार होण्याचे संकेत मिळत आहेत.

## बेल्हा-जेजुरी महामार्गावरील अपघातात स्कूटरस्वार ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** बेल्हा-जेजुरी महामार्गावरील लोणी-पाबळ रस्त्यावर झालेल्या भीषण अपघातात एका स्कूटरस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना लोणी (ता. आंबेगाव) येथील चिथ्यादेवाजवळ घडली. सुभाष रामभाऊ जाधव (वय ५२, रा. एकेरी माळ, पाबळ, ता. शिरूर) असे मृत्यू झालेल्या स्कूटरस्वाराचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रकाश बाबाजी दौंड (रा. पोंदेवाडी, ता. आंबेगाव) हा एमएच-१४ ईजे-६३७६ क्रमांकाची पल्सर मोटारसायकल घेऊन पाबळकडून लोणीकडे जात होता. त्यावेळी त्याने समोरून जाणाऱ्या ॲक्टिव्हा



स्कूटरला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत स्कूटरस्वार सुभाष जाधव गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी शिवाजी रामभाऊ जाधव यांनी पारगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मोटारसायकल चालक प्रकाश दौंड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक सचिन कांडगे करीत आहेत.

## सारांश वृत्त

### बिरसा मुंडा यांना आदरांजली

**लखनौ :** आदिवासी स्वातंत्र्यसैनिक आणि जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या १२६ व्या पुण्यतिथीनिमित्त देशभरातून त्यांना अभिवादन करण्यात आले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 'धरती आबा' बिरसा मुंडा यांना श्रद्धांजली वाहताना त्यांच्या संघर्षमय जीवनाचे स्मरण केले. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायाविरुद्ध आदिवासी समाजात आत्मसन्मान जागवून 'उलगुलान'च्या हाकेद्वारे स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा देणारे बिरसा मुंडा हे प्रेरणास्थान असल्याचे त्यांनी म्हटले.

### हिमाचलमध्ये पावसाची शक्यता व्यक्त

**शिमला :** हिमाचल प्रदेशात १५ जूनपर्यंत पावसाची शक्यता असून राज्यातील अनेक भागांत हवामान बदलण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. शिमला येथील हवामान केंद्राने गुरुवार आणि शुक्रवारसाठी कुल्लू, मंडी, शिमला आणि सिरमौर जिल्ह्यांमध्ये गारपीट, मेघगर्जना आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यांचा केशरी इशारा जारी केला आहे. सोमवारी सायंकाळपासून पुढील २४ तासांत राज्यातील बहुतांश भागांत हवामान कोरडे राहिले. मनाली येथे १२ मिमी पावसाची नोंद झाली. तसेच कल्पा येथे ०.८ मिमी पाऊस पडला.

### तरुणाची गोळ्या झाडून हत्या

**हजारीबाग :** झारखंडमधील हजारीबाग जिल्ह्यात दुचाकीवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. सोमवारी रात्री सुमारे ११ वाजता करसो पुलाजवळ हा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकी सोनी (वय ३०) हा आपल्या मित्रासह कारने कोडरमा रेल्वे स्थानकाकडे जात होता. करसो पुलाजवळ कारचा टायर पंक्चर झाल्याने त्यांनी वाहन थांबवले. त्याचवेळी दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर गोळीबार केला. गोळी विकी सोनी यांच्या मानेवर लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

## अभिषेक बॅनर्जी चौकशीच्या रडारवर

# तृणमूलच्या अंतर्गत संघर्षाला नवे वळण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात खळबळ उडवून देणाऱ्या तृणमूल काँग्रेसमधील फूट आणि कथित बनावट स्वाक्षरी प्रकरणाच्या तपासाला मंगळवारी नवे वळण मिळाले. राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) १७ सदस्यीय पथकाने तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्या कालीघाट येथील निवासस्थानी भेट देत चौकशी केली.

तृणमूल विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून सोवनदेब चट्टोपाध्याय यांच्या निवडीसाठी विधानसभा अध्यक्षांकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर काही आमदारांच्या बनावट स्वाक्षऱ्या करण्यात आल्याचा आरोप आहे. याच प्रकरणाच्या तपासासाठी सीआयडीचे अधिकारी मंगळवारी दुपारी ३० बी, हरीश चॅटर्जी स्ट्रीट येथील निवासस्थानी पोहोचले.



तपास अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी सीआयडीच्या नोटीसला दिलेल्या उत्तरात संबंधित स्वाक्षऱ्या पक्षाच्या केंद्रीय कार्यालयात गोळा करण्यात आल्याचे नमूद केले होते. त्या माहितीच्या आधारे तपास पथकाने कालीघाट येथील ठिकाणी भेट दिली. सुरुवातीला सुरक्षा कर्मचाऱ्यांनी पथकाला प्रवेश नाकारल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. तृणमूलचे नेते आणि माजी खासदार सुभाशीष चक्रवर्ती यांनी अभिषेक बॅनर्जी यांच्या अनुपस्थितीत सीआयडीला प्रवेश देण्यात आला नसल्याचे सांगितले. अभिषेक उपस्थित झाल्यानंतर तपास यंत्रणांना आवश्यक सहकार्य केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अभिषेक बॅनर्जी यांना देखील या प्रकरणात चौकशीसाठी नोटीस बजावण्यात आली असून त्यांना कोलकात्यातील भवानी भवन येथील सीआयडी मुख्यालयात हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. विधानसभा अध्यक्षांकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील स्वाक्षऱ्यांच्या सत्यतेची पडताळणी करण्यासाठी तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडीवरून तृणमूल काँग्रेसमध्ये अभूतपूर्व संघर्ष निर्माण झाला आहे. विधानसभा निवडणुकीनंतर पक्ष नेतृत्वाने सोवनदेब चट्टोपाध्याय यांना विरोधी पक्षनेतेपदासाठी पुढे केले होते. मात्र, पक्षातील ८० पैकी ५८ आमदारांनी नेतृत्वाच्या निर्णयाला विरोध करत हदपार आमदार ऋताब्रता बॅनर्जी यांना पाठिंबा दिल्याचा दावा केला जात आहे.

या वादानंतर बंडखोर गटाने विधिमंडळ पक्षावर नियंत्रण मिळवल्याचा दावा केला असून ऋताब्रता बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड केल्याचे जाहीर करण्यात आले. विधानसभा अध्यक्षांनीही त्यास मान्यता दिल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे १९९८ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या स्थापनेनंतर प्रथमच पक्षात उघड फूट पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

या घडामोडींमुळे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वासमोरील राजकीय आव्हाने आणखी वाढली असून, आगामी काळात या प्रकरणाचे पडसाद राज्याच्या तसेच राष्ट्रीय राजकारणात उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## दिल्लीत १० जनपथवर महत्त्वाची बैठक



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांची दिल्लीतील १० जनपथ येथील निवासस्थानी भेट घेतली. विरोधी पक्षांच्या अलीकडील बैठकीनंतर आणि पश्चिम बंगालमधील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या बैठकीत विरोधी पक्षांच्या भविष्यातील रणनीती, राष्ट्रीय स्तरावरील राजकीय समन्वय तसेच तृणमूल काँग्रेससमोरील सध्याच्या आव्हानांवर चर्चा झाली. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षातील काही खासदार आणि आमदारांनी बंडखोरीचा मार्ग स्वीकारल्याने तृणमूल नेतृत्वासमोर निर्माण झालेल्या परिस्थितीवरही विचारविनिमय झाल्याचे सांगितले जाते.

सोमवारी झालेल्या विरोधी पक्षांच्या बैठकीत काँग्रेस नेते राहुल गांधी आणि ममता बॅनर्जी यांच्यातील सौहार्दपूर्ण संवाद चर्चेचा विषय ठरला होता.

दरम्यान, तृणमूल काँग्रेसनेही सामाजिक माध्यमावरील पोस्टमधून ममता बॅनर्जी आणि सोनिया गांधी यांच्यातील भेटीचा उल्लेख केला. "काही गोष्टी शब्दांत व्यक्त करता येत नाहीत; त्यासाठी एक स्मितहास्य पुरेसे असते. देशासाठी केलेल्या अनेक दशकांच्या सेवेमुळे हे नाते अधिक दृढ झाले आहे," असे पक्षाने म्हटले.

## २४ भारतीय खलाशांची सुखरूप सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ओमानच्या किनाऱ्याजवळ संशयास्पद क्षेपणास्त्र हल्ल्याला सामोरे गेलेल्या पलाऊ ध्वजांकित एमटी मारिवेक्स या व्यापारी तेलवाहू जहाजावरील सर्व २४ भारतीय खलाशांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. भारतीय तटरक्षक दलाने मंगळवारी ही माहिती दिली.

८ जून रोजी ओमानमधील मसिराह बेटाजवळ नांगर टाकून उभ्या असलेल्या एमटी मारिवेक्स या टँकरवर संशयास्पद क्षेपणास्त्र हल्ला झाल्याची माहिती जहाजावरील एका खलाशाच्या नातेवाईकाने मुंबईतील मेरीटाइम रेस्क्यू को-ऑर्डिनेशन सेंटर (एमआरसीसी) ला दिली होती. माहिती मिळताच एमआरसीसी मुंबईने तातडीने ओमान मेरीटाइम सर्च अँड रेस्क्यू सेंटरशी (ओएमएससी) संपर्क साधून मदतीची विनंती केली. त्यानंतर ओमानी अधिकाऱ्यांनी त्वरित बचाव मोहीम हाती घेत जवळील जहाजाला घटनास्थळी पाठवले आणि दोन बचाव हेलिकॉप्टर तैनात केले. भारतीय आणि ओमानी बचाव यंत्रणांमध्ये सातत्याने समन्वय राखण्यात आला. अखेर ओमानच्या नौदलाच्या हेलिकॉप्टरद्वारे सर्व २४ भारतीय खलाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याची नोंद नसल्याचे तटरक्षक दलाने स्पष्ट केले. सर्व खलाशी सुरक्षित असल्याची पुष्टी करण्यात आली असून संबंधित टँकर अद्याप मसिराह परिसरात नांगर टाकून उभा आहे.

भारतीय तटरक्षक दलाने या यशस्वी कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय सागरी सहकार्याचे महत्त्व अधोरेखित झाल्याचे नमूद केले. प्रभावी समन्वय आणि त्वरित प्रतिसादामुळे मोठी दुर्घटना टळल्याचेही आयसीजीने सांगितले.

## 'टू फिंगर टेस्ट'वर झारखंड उच्च न्यायालयाची बंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची :** बलात्कार पीडितांच्या सन्मान, गोपनीयता आणि शारीरिक स्वातंत्र्याचे उल्लंघन करणारी वादग्रस्त 'टू फिंगर टेस्ट' पद्धत तात्काळ बंद करण्याचे निर्देश झारखंड उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. सर्व सरकारी तसेच खासगी रुग्णालयांमध्ये या चाचणीवर संपूर्ण बंदी घालण्याचे आदेश न्यायालयाने दिले असून, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचेही स्पष्ट केले आहे. मुख्य न्यायमूर्ती एम. एस. सोनक आणि न्यायमूर्ती राजेश शंकर यांच्या खंडपीठाने बलात्कार पीडितांच्या संरक्षण व पुनर्वसनासंदर्भातील जनहित याचिकेवर सुनावणी करताना हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

न्यायालयाने गृह, कारागृह आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाला सर्व वैद्यकीय संस्थांसाठी स्पष्ट परिपत्रक जारी करण्याचे निर्देश दिले आहेत. 'टू फिंगर टेस्ट' ही वैद्यकीयदृष्ट्या अवैज्ञानिक आणि पीडितेच्या मानवी हक्कांचे उल्लंघन करणारी प्रक्रिया असल्याचे न्यायालयाने नमूद केले. या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध व्यावसायिक गैरवर्तनाचा गुन्हा मानून कारवाई केली जाईल. याचबरोबर न्यायालयाने बलात्कार पीडितांच्या पुनर्वसनासाठी आणि त्यांच्या मुलांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण आदेश दिले. बलात्कारातून जन्मलेल्या मुलांना बारावीपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी नोडल अधिकारी नेमण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच अशा विद्यार्थ्यांना आयआयटी, एनआयटी, एम्स, आयआयएम आणि इतर उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळाल्यास शिष्यवृत्ती उपलब्ध करून देण्यासही न्यायालयाने सांगितले.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने समाजातील पीडितांविषयीच्या दृष्टिकोनावरही तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेकदा बलात्कार पीडितांनाच आरोपी असल्याप्रमाणे वागणूक दिली जाते, सामाजिक बहिष्कार सहन करावा लागतो आणि त्यामुळे त्यांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना मोठा मानसिक त्रास होतो, असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

पीडितांना त्यांच्या मूळ राहत्या ठिकाणी राहणे अवघड झाल्यास त्यांचे सुरक्षित पुनर्वसन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचे निर्देशही राज्य सरकारला देण्यात आले आहेत. समाजातील पीडितांना दोष देण्याची प्रवृत्ती बदलण्याची गरज असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

## निदर्शकांवरील कारवाईवरून भारत आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पाकव्याप्त काश्मीरमध्ये (पीओके) निदर्शकांवर झालेल्या कथित पोलिस कारवाईच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानवर जोरदार टीका केली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने (एमईए) मंगळवारी पाकिस्तानवर विविध मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याचा आरोप करत आंतरराष्ट्रीय समुदायाने इस्लामाबादला त्याच्या कृत्यांसाठी जबाबदार धरावे, अशी मागणी केली.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत बोलताना पाकिस्तानवर स्वतःचे अपयश झाकण्याचा आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनापासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, पाकिस्तानकडून खोट्या बातम्या आणि दिशाभूल करणारे व्हिडिओ प्रसारित करण्याचा एक ठराविक पॅटर्न दिसून येत आहे.

पीओकेमधील विविध भागांत शासनव्यवस्था, आर्थिक संकट, वाढती महागाई, वीजदरवाढ, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई आणि विधानसभा मतदारसंघांच्या आरक्षणासंदर्भातील प्रश्नांवरून नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. या आंदोलनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पाकिस्तानी सुरक्षा दलांनी कठोर कारवाई केल्याचे वृत्त समोर आले आहे.

जयस्वाल यांनी सांगितले की, पाकव्याप्त काश्मीरमध्ये आर्थिक अडचणी आणि मूलभूत अधिकारांच्या अभावाविरोधात आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर झालेल्या कारवाईबाबत भारत गंभीर चिंता व्यक्त करीत आहे. या कारवाईत अनेक आंदोलकांचा मृत्यू झाला असून मोठ्या संख्येने नागरिक जखमी झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पाकिस्तानने निमलष्करी दल तैनात केले आहे.

## २०३० पर्यंत जगातील ३ टक्के वीज एआयसाठी खर्च

### कृत्रिम बुद्धिमत्तेची वाढती किंमत

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** मानवी श्रम आणि खर्च कमी करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे भविष्यातील महत्त्वाचे तंत्रज्ञान मानले जात असले तरी त्याची पर्यावरणीय आणि आर्थिक किंमतही झपाट्याने वाढत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालानुसार, २०३० पर्यंत जगभरात उत्पादित होणाऱ्या एकूण विजेपैकी सुमारे ३ टक्के वीज केवळ एआय प्रणाली आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या डेटा सेंटर्सच्या वापरासाठी खर्च होण्याची शक्यता आहे.

अहवालानुसार, कृत्रिम बुद्धिमत्तेचा झपाट्याने वाढणारा वापरामुळे ऊर्जा वापरात मोठी वाढ होणार आहे. इतकेच नव्हे तर एआयशी संबंधित डेटा सेंटर्समधून होणारे कार्बन उत्सर्जन भविष्यात ब्रिटनसारख्या विकसित देशाच्या वार्षिक उत्सर्जनाच्या तुलनेत पोहोचू शकते, अशीही भीती व्यक्त करण्यात आली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी वापरल्या जाणाऱ्या उच्च क्षमतेच्या संगणक सर्व्हरना सतत थंड ठेवावे लागते. यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, २०३० पर्यंत एआय डेटा सेंटर्सना सुमारे ९.३ ट्रिलियन लिटर पाण्याची आवश्यकता भासू शकते. ही मात्रा जगातील अब्जावधी लोक एका वर्षात पिण्यासाठी वापरत असलेल्या पाण्याइतकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत डेटा सेंटर्सचा वीज वापर सातत्याने वाढत आहे. अहवालात नमूद करण्यात आले आहे की, एआय तंत्रज्ञानाचा विस्तार याच वेगाने सुरू राहिला तर ऊर्जा उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक संसाधनांचा वापर करावा लागेल. काही अंदाजानुसार, वाढत्या वीज गरजा भागवण्यासाठी २०३० पर्यंत अब्जावधी झाडांवर अप्रत्यक्ष परिणाम होऊ शकतो. याशिवाय नव्या डेटा सेंटर्ससाठी मोठ्या भूभागाची आवश्यकता असेल. काही अभ्यासांनुसार, एआय पायाभूत सुविधा उभारण्यासाठी लागणारी जमीन मेक्सिको सिटीच्या क्षेत्रफळापेक्षा जास्त असू शकते.

सध्या जगातील केवळ ३२ देशांकडे एआयसाठी आवश्यक असलेली स्वतंत्र क्लाउड पायाभूत सुविधा विकसित करण्याची क्षमता आहे. यातील सुमारे ९० टक्के एआय संगणकीय क्षमता अमेरिका आणि चीनमध्ये केंद्रित असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे एआय क्षेत्रात काही मोजक्या देशांचे वर्चस्व निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

## दहशतवाद्यांच्या नेटवर्कवर एनआयएचे छापे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) मंगळवारी पाकिस्तानस्थित दहशतवादी शहजाद भट्टी याच्याशी संबंधित दहशतवादी-गँगस्टर नेटवर्कविरोधात मोठी कारवाई करत पंजाब आणि हरियाणातील १८ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. या कारवाईत महत्त्वाची डिजिटल उपकरणे, कागदपत्रे आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित पुरावे जप्त करण्यात आले.

एनआयएच्या पथकांनी पंजाब आणि हरियाणातील नऊ जिल्ह्यांमधील विविध ठिकाणी समन्वित शोधमोहीम राबवली. तपासादरम्यान अनेक संशयित व्यक्तींची चौकशी करण्यात आली असून काहींना पुढील तपासासाठी नोटिसही बजावण्यात आल्या आहेत.

एनआयएने दिलेल्या माहितीनुसार, छाप्यांमध्ये विविध डिजिटल उपकरणे, संवाद नेटवर्कशी संबंधित माहिती, आर्थिक व्यवहारांचे दस्तऐवज तसेच तपासाच्या कक्षेत असलेल्या व्यक्तींच्या हालचालींबाबत महत्त्वाचे पुरावे हाती लागले आहेत. जप्त करण्यात आलेले सर्व साहित्य न्यायवैद्यक आणि तांत्रिक तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे. ही कारवाई शहजाद भट्टीच्या नेटवर्कमागील व्यापक दहशतवादी कटाचा पर्दाफाश करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या तपासाचा भाग असल्याचे एनआयएने स्पष्ट केले. भट्टीच्या सहकाऱ्यांची ओळख पटविणे आणि त्यांच्या नेटवर्कची व्याप्ती उघड करणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

तपासादरम्यान मार्च २०२५ मध्ये पंजाबमधील जालंधर येथे सोशल मीडिया इन्फ्लुएंसर रॉजर संधू यांच्या घरावर झालेल्या ग्रेनेड हल्ल्यामागे शहजाद भट्टीचा हात असल्याचे समोर आले होते.

या प्रकरणात एनआयएने एप्रिल २०२६ मध्ये भट्टीसह अन्य एका फरार आरोपीविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. याशिवाय नोव्हेंबर २०२५ मध्ये हरियाणातील सिरसा महिला पोलीस ठाण्यात झालेला स्फोट आणि जानेवारी २०२६ मध्ये अंबालाच्या बलदेव नगर पोलीस ठाण्यात झालेला कार बॉम्बस्फोटामागेही भट्टी हा मुख्य सूत्रधार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

### तामिळनाडूला १,००० कोटींची मदत

**चेन्नई :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन आणि पुनर्स्थापना कामांसाठी तामिळनाडूला केंद्र सरकारकडून १,००० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याची माहिती राज्याचे महसूल व आपत्ती व्यवस्थापन मंत्री के. ए. सेनगोट्टयान यांनी दिली. केंद्राने कोणताही विलंब न करता हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मान्सूनदरम्यान उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा प्रभावी सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

## राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसला धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठा धक्का बसला असून पक्षाच्या उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आला आहे. त्यामुळे मतदान होण्यापूर्वीच काँग्रेस राज्यसभा निवडणुकीच्या शर्यतीतून बाहेर पडली असून भारतीय जनता पक्षाचा मार्ग मोकळा झाला आहे.

मीनाक्षी नटराजन यांनी उमेदवारी अर्ज भरताना हैदराबाद येथील न्यायालयात प्रलंबित असलेल्या एका फौजदारी प्रकरणाची माहिती लपवल्याचा आरोप करण्यात आला होता. या संदर्भात भाजपने निवडणूक अधिकाऱ्यांकडे आक्षेप नोंदविला होता. तक्रारीची दखल घेत रिटर्निंग ऑफिसरने नटराजन यांना नोटीस बजावत ९ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत स्पष्टीकरण सादर करण्यास सांगितले होते. मात्र, निर्धारित मुदतीत समाधानकारक उत्तर न मिळाल्याने उमेदवार अर्जातील माहिती अपूर्ण असल्याचे नमूद करत निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचा अर्ज फेटाळला. ८ जून ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असल्याने अर्ज रद्द झाल्यानंतर काँग्रेसकडे पर्यायी उमेदवार उभा करण्याची संधी उरली नाही. परिणामी पक्ष निवडणुकीतून बाहेर पडला आहे.

दरम्यान, काँग्रेसने या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला असून याला "लोकशाहीची हत्या" असे संबोधले आहे. विरोधी पक्षनेते उमंग सिंघार यांनी निवडणूक अधिकाऱ्यांच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## प्रथमच १२ अण्वस्त्रे तैनात, साठा १९० वर

# भारताच्या आण्विक सज्जतेला मिळाली अधिक बळकटी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताने आपल्या आण्विक धोरणात महत्त्वपूर्ण बदल करत प्रथमच १२ अण्वस्त्रे तैनात केल्याचा दावा जागतिक शस्त्रास्त्र संशोधन संस्था स्टॉकहोम आंतरराष्ट्रीय शांतता संशोधन संस्था (एसआयपीआरआय) यांच्या नव्या अहवालात करण्यात आला आहे.

या घडामोडीमुळे भारताच्या सामरिक सज्जतेत मोठी वाढ झाल्याचे मानले जात आहे. याचबरोबर जानेवारी २०२६ पर्यंत भारताच्या अण्वस्त्रसाठ्यात वाढ होऊन तो सुमारे १९० अण्वस्त्रांपर्यंत पोहोचल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.




यापूर्वी भारताची भूमिका अशी होती की शांततेच्या काळात अण्वस्त्रे आणि त्यांची वहन करणारी क्षेपणास्त्रे वेगवेगळी ठेवली जात. युद्धजन्य परिस्थिती उद्भवल्यासच दोन्ही एकत्र जोडले जात. मात्र आता काही अण्वस्त्रे क्षेपणास्त्र प्रणालींशी किंवा आण्विक पाणबुड्यांशी जोडलेल्या स्थितीत ठेवली जात असल्याचे एसआयपीआरआयचे मूल्यांकन आहे.

अहवालानुसार भारताने क्षेपणास्त्रांचे कॅनिस्टरायझेशन, दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचा विकास आणि समुद्राधारित अणु प्रतिरोधक क्षमता वाढविण्यावर विशेष भर दिला आहे. त्यामुळे काही वॉरहेड्स शांततेच्या काळातही प्रक्षेपण प्रणालींशी जोडलेले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

भारताच्या आण्विक त्रिसूत्रीला — भू, जल आणि वायू या तिन्ही माध्यमांतून अणु प्रतिहल्ला करण्याच्या क्षमतेला — या बदलामुळे आणखी बळ मिळाले आहे. विशेषतः अण्वस्त्रसज्ज पाणबुड्यांच्या तैनातीमुळे भारताची 'सेकंड स्ट्राइक' क्षमता अधिक सक्षम होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

भारताने आपल्या स्थापनेपासूनच 'नो फर्स्ट यूज' अर्थात प्रथम अणुहल्ला न करण्याचे धोरण स्वीकारले आहे. याचा अर्थ भारत कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्रांचा प्रथम वापर करणार नाही. मात्र भारतावर किंवा भारतीय सैन्यावर अणुहल्ला झाल्यास कठोर प्रतिहल्ला करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. त्यामुळे अण्वस्त्रांचा उद्देश हल्ला करणे नसून प्रतिरोधक क्षमता राखणे हा असल्याचे भारत सातत्याने स्पष्ट करत आला आहे. जानेवारी २०२६ पर्यंत भारताकडे १९० अण्वस्त्रे आहेत, तर पाकिस्तानकडे सुमारे १७० अण्वस्त्रे आहेत. गेल्या काही वर्षांत पाकिस्ताननेही नवीन अण्वस्त्र वाहक प्रणाली आणि क्षेपणास्त्रांचा विकास सुरू ठेवला असून भविष्यात त्याच्या अण्वस्त्रसाठ्यात वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. २०२५ मध्ये भारताचा संरक्षण खर्च ९२.१ अब्ज अमेरिकी डॉलर इतका होता. त्यामुळे भारत जगातील पाचवा सर्वात मोठा संरक्षण खर्च करणारा देश ठरला आहे. चीन आणि पाकिस्तानकडून निर्माण होणाऱ्या सामरिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर भारताने आपल्या लष्करी आणि आण्विक क्षमतांचे आधुनिकीकरण सुरू ठेवले आहे. जग नव्या अणु स्पर्धेच्या उंबरठ्यावर प्रवेश करत असल्याचा इशारा दिला आहे. अमेरिका, रशिया, चीन, भारत, पाकिस्तान यांसह सर्व अण्वस्त्रधारी देश आपली शस्त्रसज्जता वाढवत असून अण्वस्त्रांचे आधुनिकीकरण वेगाने सुरू आहे.